# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

**महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचा 46 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा**

**---------------------------------**

दाफाचि 26 : महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचा 46 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक श्री.संजय कृष्णाजी पाटील यांनी महामंडळाच्या आवारातील दादासाहेब फाळके यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर मुख्य प्रशासकीय अधिकारी श्रीम.गीता देशपांडे यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी महामंडळातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

कंपनी कायदा १९५६ च्या अंतर्गत २६ सप्टेंबर १९७७ रोजी, चित्रनगरीची स्थापना झाली. त्याचा मूळ उद्देश चित्रपट निर्मात्यांना सोई-सुविधा उपलब्ध करून देणे, चित्रनगरीचा विकास करणे असा आहे.

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा घटक असलेले हे महामंडळ आणि त्या अंतर्गत गोरेगाव येथे असणारी स्वर्गीय दादासाहेब फाळके चित्रनगरी सुमारे ५२१ जागेवर दिमाखाने उभी आहे. निसर्गाचा अविष्कार, नागमोडी रस्ते, शेजारी आरेचे जंगल, पलीकडे पवई डॅम अशा विविधांगी वैशिष्ट्यांनी परिपूर्ण हे ठिकाण फिल्म दुनियेचा कणा आहे.

१९७५ मध्ये एमआयडीसीने फक्त दोन स्टुडिओ, व्यवस्थापकीय संचालक निवासस्थान बांधून दिले होते. मात्र, चित्रनगरीत सध्या १६ वातानुकूलित स्टुडिओ व ६० बाहय चित्रिकरण स्थळे आहेत. इथं असणारे भव्य १६ स्टुडिओ आणि ६० हून अधिक बाहयचित्रीकरणाची ठिकाणे कोणत्याही निर्माता आणि दिग्दर्शकाला भुरळ घालतात. या परिसरात रात्रंदिवस शुटींग चालू असतात. त्यातून दररोज ५ ते ६ हजार लोकांना रोजगार मिळत आहे.

सिनेमा क्षेत्रात होणारी स्थित्यंतरे आणि आधुनिक तंत्रज्ञानाने केलेली प्रगती केंद्रस्थानी ठेवून चित्रनगरीच्या सर्वांगीण विकासासाठी

राज्याच्या सांस्कृतिक विभागाचे मंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव श्री. विकास खारगे (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्‌यमान व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे, प्रसिद्‌ध लेखक तथा सह व्यवस्थापकीय संचालक श्री.संजय कृष्णाजी पाटील आणि सर्व वरिष्ठ अधिकारी कर्मचारी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे चित्रनगरीच्या प्रगतीचा आलेख दिवसागणिक अधिकच उंचावत आहे.

हे महामंडळ मागील एक तपाहून अधिक काळ नफ्यात आहे. गतवर्षी महामंडळास तब्बल 43 कोटींचा निव्वळ नफा झाला आहे. यंदा महामंडळाने १०४ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला आहे. महामंडळाच्या या प्रगतीत आणि यशस्वी वाटचालीत प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांची दुरदृष्टी, धोरण, नियोजन, मेहनत, निर्धार, जिद्‌द आणि केलेले कष्ट यांचा मोठा वाटा आहे.

चित्रनगरीच्या पायाभूत प्रगतीसाठी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्ताने पहिल्यांदाच शासनाने महामंडळास तब्बल १०० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांना चालना मिळणार आहे. आजच्या घडीला राज्य शासनाच्या वतीने चित्रपटांशी संबंधित, दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थ सहाय्य योजना, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या संस्थांना सहाय्यक अनुदान योजना, त्याचबरोबर सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींवर चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थेस अर्थ सहाय्य योजना आणि राज्य चित्रपट महोत्सव आदि योजना महामंडळामार्फत राबवल्या जात आहेत.

त्याचबरोबर मराठी चित्रपटाना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी गोवा आणि कान्स आंतरराष्ट्रीय फिल्म बाजारात महामंडळ गेली दहा वर्ष मराठी चित्रपटांना घेऊन जात आहे. त्यामुळे चित्रपट व्यवसायाला मोठे पाठबळ मिळत आहे. त्याचबरोबर चित्रीकरणाशी संबंधित सर्व परवानग्या एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी 'सिंगल विंडो सिस्टीम'ची अंमलबजावणी करण्यासाठी महामंडळ मेहनत घेत आहे.

आजपर्यंत येथे चित्रीत झालेले विविध भाषेतील शेकडो सिनेमे, मालिका आणि हजारो गाणी, डायलॉग अजरामर झाली आहेत. हजारो लोकांच्या आयुष्याला कलाटणी आणि रोजगार देणारी ही फिल्मसीटी गेली साडेचार दशके फिल्मी दुनियेसाठी कर्मभूमी ठरली आहे.

-----------------------------------